अर्थसंकल्पिय अनुदान सन २०१७-२०१८
"२२१५ पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१) (०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)"
मागणी क्रमांक वाय -२

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन निर्णय क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२७/पापु-२३

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख : १२ मार्च, २०१८

<u>वाचा :-</u>

1. **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल,२०१७**
2. **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि. ३० जून,२०१७**
3. **शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२७/पापु-२३, दि. १७ एप्रिल, २०१७**
4. **शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२७/पापु-२३, दि. २२ जून, २०१७**
5. **शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि., क्रमांकः बजेट-१४१७/प्र.क्र.१२७/पापु-२३, दि. १६ फेब्रुवारी, २०१७**

<u>प्रस्तावना :-</u>

जिल्हा परिषदेमधील ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व वेतनेतर खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" या लेखाशिर्षाखाली वित्तीय वर्ष सन २०१७-२०१८ करिता ०१, वेतन यासाठी रुपये ३०,१५,१०,०००/-(अक्षरी रुपये तीस कोटी पंधरा लाख दहा हजार फक्त) व ११, देशांतर्गत प्रवास खर्चासाठी रुपये १,०१,९८,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी एक लाख अठ्ठयाण्णव हजार फक्त) असे एकूण रुपये ३१,१७,०८,०००/- (अक्षरी रुपये एकतीस कोटी सतरा लाख आठ हजार फक्त) इतका निधी सन २०१७-१८ मध्ये अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

२. सदर तरतुदीपैकी ०१, वेतन व ११, देशांतर्गत प्रवास खर्चासाठी एकूण रुपये ७,२१,९५,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी एकवीस लाख पंच्याण्णव हजार फक्त) इतका निधी वाचा

मधील अनुक्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये, रुपये १७,२४,८५,०००/- (अक्षरी रुपये सतरा कोटी चोवीस लाख पंच्याऐंशी हजार फक्त) इतका निधी वाचा मधील अनुक्रमांक ४ च्या शासन निर्णयान्वये तसेच रुपये २,४५,००,०००/- (अक्षरी रुपये दोन कोटी पंचेचाळीस लाख फक्त) इतका वेतन निधी वाचा मधील अनुक्रमांक ५ च्या शासन निर्णयान्वये संबंधित सर्व जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात आला आहे. आता जिल्हा परिषदांकडून अतिरिक्त निधीसंदर्भात प्राप्त झालेल्या मागण्या व त्यांनी आत्तापर्यन्त केलेला खर्च विचारात घेऊन जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन खर्च भागविण्यासाठी लेखाशिर्ष २२१५ १८४३ अंतर्गत एकूण रुपये ६०,५५,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख पंचावन्न हजार फक्त) इतका निधी जिल्हा परिषदांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षासाठी जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या आस्थापनेवरील वर्ग १ व वर्ग २ च्या अधिका-यांचे वेतन व प्रवासभत्ता खर्च भागविण्यासाठी, मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" या लेखाशिर्षाखाली ०१, वेतन साठी रुपये ६०,५५,०००/- (अक्षरी रुपये साठ लाख पंचावन्न हजार फक्त) इतका निधी या शासन निर्णयासोबतच्या "विवरणपत्र अ" मधील स्तंभ ३ मध्ये दर्शविल्यानुसार संबंधित मुख्य लेखा व वित्त अधिकारी, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी बिम्स प्रणालीवर देखील वितरीत करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात आलेला निधी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहील. या शासन निर्णयासोबतच्या विवरणपत्र अ मधील स्तंभ क्रमांक ५ मध्ये दर्शविण्यात आलेल्या रकमांपेक्षा अधिक खर्च होणार नाही याची दक्षता सर्व संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांनी घ्यावी. तसेच सदर निधी ज्या प्रयोजनासाठी आहे त्याच प्रयोजनासाठी खर्च होईल याचीही दक्षता घेण्यात यावी.

३. सदर शासन निर्णयान्वये तसेच यापूर्वी वितरीत केलेल्या निधीची उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केल्याची खात्री करुनच पुढील आर्थिक वर्षासाठी आवश्यक निधीची मागणी करण्याची दक्षता घेण्यात यावी. वितरीत केलेला निधी खर्च झाल्याशिवाय अतिरिक्त निधी यापुढे वितरीत केला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

४. या शासन निर्णयाव्दारे वितरीत करण्यात आलेल्या निधीतून होणारा खर्च मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)" ०१, वेतन व ११, देशांतर्गत प्रवास खर्च या लेखाशिर्षामधून आर्थिक वर्ष सन २०१७-२०१८ साठी मंजूर करण्यात आलेल्या निधीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्रमांक अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल,२०१७ अन्वये विभागांना दिलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे. या शासन परिपत्रकातील परिच्छेद ७ ते १८ मधील अटी तसेच परिशिष्टामधील इतर अटी व शर्तीची पूर्तता होत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१२१२३९५३८८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.03.12 13:07:09 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विधानसभा / विधान परिषद, सर्व
२. विभागीय आयुक्त,
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
५. संचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे
६. सर्व जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
७. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
९. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सर्व
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
१२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी

१३. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, सर्व
१४. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१५. वित्त विभाग, (व्यय-३ व अर्थ-१९)
१६. कार्यासन क्रमांक पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१७. ग्राम विकास व जलसंधारण विभाग
१८. निवड नस्ती कार्यासन पापु-२३

विवरणपत्र - अ

शासन निर्णय क्रमांक बजेट-१४१७/प्र.क्र.१२७/पापु-२३, दिनांक १२ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र

मागणी क्रमांक वाय-२ "२२१५, पाणीपुरवठा व स्वच्छता ०१, पाणीपुरवठा ००१, संचालक व प्रशासन (०१)(०१) पाणीपुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी विभागीय / उप विभागीय आस्थापना (२२१५ १८४३)"			
अ. क्र.	जिल्ह्याचे नांव	सन २०१७-२०१८ करीता या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला वेतन निधी	या शासन निर्णयान्वये लेखाशीर्ष २२१५ १८४३ खाली वितरीत करण्यात येत असलेली एकूण रक्कम (अक्षरी रुपये)
१	२	३	४
१	रायगड	३६००००	रूपये तीन लाख साठ हजार फक्त
२	जळगांव	४०००००	रूपये चार लाख फक्त
३	पुणे	५५००००	रूपये पाच लाख पन्नास हजार फक्त
४	सांगली	४५००००	रूपये चार लाख पन्नास हजार फक्त
५	सोलापूर	४५००००	रूपये चार लाख पन्नास हजार फक्त
६	परभणी	३८००००	रूपये तीन लाख ऐंशी हजार फक्त
७	नांदेड	६१००००	रूपये सहा लाख दहा हजार फक्त
८	लातूर	२४००००	रूपये दोन लाख चाळीस हजार फक्त
९	बुलढाणा	३२००००	रूपये तीन लाख वीस हजार फक्त
१०	अकोला	५००००	रूपये पन्नास हजार फक्त
११	वाशिम	६५००००	रूपये सहा लाख पन्नास हजार फक्त
१२	अमरावती	४५००००	रूपये चार लाख पन्नास हजार फक्त
१३	भंडारा	४८००००	रूपये चार लाख ऐंशी हजार फक्त
१४	गोंदिया	१२५०००	रूपये एक लाख पंचवीस हजार फक्त
१५	चंद्रपूर	५४००००	रूपये पाच लाख चाळीस हजार फक्त
एकूण		६०५५०००	रूपये साठ लाख पंचावन्न हजार फक्त

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.03.12 13:08:57 +05'30'

(बाळासाहेब बा. हजारे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन